

# गुरू

**कांचन गोडबोले** (क्लिवलँड ओहायो )

गुरू म्हणजे आहे कोण ?
ज्याच्याकडून  प्राप्त होते शिक्षण

गुरू म्हणजे आपली शाळा
अक्षरांची ओळख करतो जिचा फळा

गुरू म्हणजे एक मैत्रीण किंवा मित्र
शिकवतो जो निरपेक्ष मैत्रीचे स्तोत्र

गुरू म्हणजे आपले आई आणि वडील
आचरणात आणावेत चांगले संस्कार त्यांच्याकडील

कधी कधी छोटी मुलेही
शिकवतात  काही छान गोष्टी
जीवनाकडे निष्पापतेने
बघण्याची त्यांची असते दृष्टी

आयुष्यात काय आहे अनुरूप
गुरू दाखवतो त्याचे स्वरूप

संकटाची जेव्हा कधी येते लाट
गुरू दाखवतो तेव्हा योग्य वाट

जेव्हा कधी उरत नाही आशा
गुरू दाखवतो एक  दिशा

गुरू  देतो आपणास स्फूर्ती
लाभते यश आणि कीर्ती

गुरू  म्हणजे पाया, गुरू म्हणजे छाया
गुरू म्हणजे देव, पार करतो ही  जीवन-नय्या

लाभतो ज्यांस चांगल्या गुरूंचा सहवास
बुध्दीमय आणि सुफल होतो त्यांच्या आयुष्याचा प्रवास

गुरू  असतो श्वासात, असतो अंतरंगात,
आत्मविश्वासाच्या दिव्याची तेवत ठेवतो  वात

गुरू  भेटतो कोणां माणसांत
गुरू  वसतो पक्षीप्राण्यांत,
गुरू  असतो फुलांफुलांत
गुरू  असतो प्रत्येक जणांत, प्रत्येक कणांत

सुविचार,ज्ञान आणि आज्ञाधारकता ह्या
सर्वांची गुरू आणि शिष्य साधतात जो मेळ,
गुरूपौर्णिमेची आली ही  पवित्र वेळ

सतत काहीतरी, विधायक करत राहूया,
लावूया आयुष्य सत्कारणी,
ज्ञान,सद्विचार,सत्कर्म ह्यांची फुले,
वाहूया  गुरूचरणी !

***